दिनांक १ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र-ब मध्ये दुरूस्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन शुध्दीपत्र क्रमांक :-माशामु-२०१६/(११/१६)/२०१६/एसएम-४
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० मे, २०१८.

वाचा :- (१) शासन निर्णय :-क्र. माशामु-२०१६/(११/१६)/२०१६/एसएम-४, दिनांक १ जूलै, २०१६.
(२) विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांचे पत्र क्र.शिउसं/ला/मावि-२/१७-१८/ ५८६७/७० दिनांक २१ मे, २०१८.

शासन शुध्दीपत्र :-

कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या खाजगी माध्यमिक शाळांना अनुदानासाठी पात्र घोषित करण्याचा निर्णय संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये घेतला आहे. सदर शासन निर्णयासोबत **प्रपत्र-ब** मध्ये अ.क्र. १४९ वर अल रहमान एज्युकेशन ॲड सोशल वेलफेअर फाऊंडेशन, लातूर संचलित सिद्दीक उर्दू माध्यमिक विद्यालय, लातूर या शाळेच्या इयत्ता ८ वी ते १० वी (तिसरी तुकडी) अनुदानास पात्र घोषित केली आहे.

२. सदर शाळेचे इयत्ता ८ वी ते १० वी (प्रथम वर्ग) अशी दुरुस्ती करण्याबाबत शिक्षण उपसंचालक, लातूर यांनी संदर्भाधीन क्र. (२) अन्वये विनंती केली आहे.

३. संदर्भाधीन क्र. (१) दिनांक १ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयासोबतच्या **प्रपत्र-ब** मधील अ.क्र.१४९ वर संदर्भाधीन क्र. (२) येथील शिक्षण उपसंचालक, लातूर यांच्या दिनांक २१ मे, २०१८ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, संदर्भाधीन क्र. (१) येथील दिनांक १ जूलै, २०१६ च्या शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र-ब मधील लातूर विभागांतर्गत अनुक्रमांक १४९ वर "अल रहमान एज्युकेशन ॲड सोशल वेलफेअर फाऊंडेशन लातूर संचलित सिद्दीक उर्दू माध्यमिक विद्यालय, लातूर" या शाळेसमोर रकाना क्र. ४ मध्ये "इयत्ता ८ वी ते १० वी (तिसरी तुकडी)" ऐवजी **"इयत्ता ८ वी ते १० वी (प्रथम वर्ग)"** असे वाचण्यात यावे. शासन निर्णयातील अन्य अटी व शर्ती तशाच कायम राहतील.

२. सदर शासन शुध्दीपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०५३०१५३६२४२१२१ असा आहे. हे शुध्दीपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e1d6f07c5cabf5884958ee70015d36b35b2c07e9700fe62cba2439a81b4be4, serialNumber=007d84f8ce44beba86b0ca2d0155d67cc1a9db4f8d59bc9d8067628d62bcdc1a, cn=Swati Madhukar Nanal
Date: 2018.05.30 15:38:26 +05'30'

(स्वाती नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :- शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग,लातूर,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, लातूर,
निवडनस्ती (एसएम-४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, मुंबई.